पोलीस आयुक्त, ठाणे यांचेकार्यालय

खारकर आळी, कळवा ब्रिज जवळ, ठाणे, ४००६०१, दूरध्वनी क्रमांक - ०२२ - २५४४३६३६

Email - cp.thane.confibr@mahapolice.gov.in

जा.क्र.ठाआ/गोशा/विधी अधिकारी पद भरती/ 2039 /२०२६, दिनांक 20/०७/२०२६

विधी अधिकारी गट "ब" आणि विधी अधिकारी या पदाचे निवडीसाठी आयोजित केलेल्या लेखी परिक्षेसाठी उमेदवारांना सर्वसाधारण सुचना

-----०००-----

ठाणे पोलीस आयुक्तालयाचे आस्थापनेवर विधी अधिकारी गट "ब" आणि विधी अधिकारी यांची रिक्त पदे निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात ११ महिन्याच्या कालावधीकरीता पुर्णत: कंत्राटी पध्दतीने भरण्याची कार्यवाही सुरू आहे. त्यानुषंगाने विधी अधिकारी गट "ब" आणि विधी अधिकारी या दोन्ही पदांची लेखी परिक्षा दिनांक ०१/०८/२०२६ रोजी सकाळी १४.०० ते १६.०० वा या वेळेत **"ठाणे पोलीस स्कुल, खारकर आळी, पोलीस अधीक्षक ठाणे ग्रामीण यांचे कार्यालया समोर, ठाणे पश्चिम, ठाणे ४०० ६०१"** या ठिकाणी आयोजीत करण्यात आली आहे.

तरी याद्वारे विधी अधिकारी गट "ब" आणि विधी अधिकारी पदासाठी अर्ज सादर केलेल्या उमेदवारांना खालीलप्रमाणे सुचना देण्यात येत आहेत.

१. उमेदवारांनी लेखी परिक्षेसाठी शासनाने निर्धारीत केलेल्या ओळखपत्रासह (आधारकार्ड/पॅनकार्ड/मतदान कार्ड इ. यापैकी एक) उपस्थित रहावे. उमेदवाराकडे नमुद शासकीय ओळखपत्र नसल्यास त्यांना परिक्षा केंद्रामध्ये प्रवेश दिला जाणार नाही.
२. उमेदवारांनी परिक्षा केंद्रावर परिक्षा सुरु होण्यापुर्वी ०२ तास अगोदर पोहचणे अपेक्षीत आहे.
३. लेखी परिक्षा सुरू झाल्यानंतर विलंबाने येणा-या उमेदवारास लेखी परिक्षेसाठी प्रवेश दिला जाणार नाही.
४. परिक्षा केंद्रात एकदा प्रवेश केल्यानंतर परिक्षा संपेपर्यत बाहेर जाण्यास सक्त मनाई राहील.
५. उमेदवारांव्यतिरिक्त त्यांच्या कोणीही नातेवाईक व जवळच्या व्यक्तींना परिक्षा केंद्रात प्रवेश दिला जाणार नाही. तसे आढळून आल्यास संबधितांविरूध्द कारवाई करण्यात येईल.
६. लेखी परिक्षा ०२ तासाची व ५० गुणांची आहे. लेखी परिक्षेचा पेपर मराठी किंवा इंग्रजी यापैकी एका भाषेतुन लिहीता येईल.
७. उमेदवारांनी पेपर लिहीण्यासाठी पारदर्शक पॅड व काळया शाईचे बॉल पेनचा वापर करावा.
८. उमेदवारांनी उत्तरपत्रिकेवर कोणतेही चिन्ह नमुद करु नये/ नाव लिहु नये/ खाडाखोड अथवा पुनर्लेखन करु नये असे आढळुन आल्यास त्यास भरती प्रक्रियेतुन अपात्र ठरविण्यात येईल.
९. उमेदवार कॉपी किंवा इतर आक्षेपार्ह वर्तन करताना आढळुन आल्यास त्यांचेविरुध्द कायदेशीर कारवाई करण्यात येवुन त्यास भरती प्रक्रियेमधुन अपात्र ठरवुन त्याची उमेदवारी रद्द करण्यात येईल.
१०. परिक्षा केंद्रामध्ये मोबाईल फोन, ब्ल्यु-टयुथ, इयरफोन, स्मार्टवॉच, डिजीटल डायरी, कॅलक्युलेटर, नोटपॅड, नोट बुक तसेच इतर असे कुठलेही साहीत्य, ज्याचा कॉपी करण्यासाठी उपयोग होईल अथवा उपयोग होऊ शकतो असे साहित्य आणण्यास सक्त मनाई आहे. असे करतांना उमेदवार आढळुन आल्यास त्यास त्याचक्षणी अपात्र ठरवुन त्यांची उमेदवारी रद्द करण्यात येईल.
११. उमेदवारांना लेखी परिक्षेबाबत काही शंका/ तक्रार असल्यास त्या संदर्भात लेखी परिक्षा संपल्यानंतर १२ तासाचे आत भरती कक्षाला लेखी स्वरुपात समक्ष निवेदन सादर करावे. सदर कालावधीनंतर प्राप्त निवेदनांचा विचार केला जाणार नाही, याची सर्व उमेदवारांनी दक्षता घ्यावी.

(डॉ. शिवाजी राठोड)
अपर पोलीस आयुक्त, प्रशासन, ठाणे

प्रत :- पोलीस निरीक्षक, सोशल मिडीया कक्ष, ठाणे

२/- सदरच्या सुचना ठाणे पोलीस आयुक्तालयाचे संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात याव्यात.